# जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय,सिंधुदुर्ग यांचे नियंत्रणाखाली येणा—या तालुका न्यायालयांमध्ये त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कंपनीचे फोटो कॉपिअर यंत्रे पुरविणेत आलेली आहेत. सदरहू फोटो कॉपिअर यंत्रांचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार **दि. ११/०४/२०२५** रोजी संपणार आहे. सदरची यंत्रणा सुस्थितीत रहाणेसाठी त्यांची देखरेख व आवश्यक दुरुस्ती वेळेत करुन फोटो कॉपिअर यंत्र विना अडथळा चालू रहाण्याच्या दृष्टीने पुढील एक वर्षाकरीता **'वार्षिक देखभाल दुरुस्ती करार'** करणेसाठी निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | फोटो कॉपिअर यंत्राचा तपशिल |
|---|---|---|
| १ | दिवाणी न्यायालय(व.स्तर), सिंधुदुर्ग मु. ओरोस | Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206 |
| २ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), सावंतवाडी | Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206 |
| ३ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), वेंगुर्ला | Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206 |
| ४ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), कुडाळ | Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206 |
| ५ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), कणकवली | Kyocera Digital Copy Model 2201 |
| ६ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), देवगड | Kyocera Digital Copy Model 2201 |
| ७ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), दोडामार्ग | Kyocera Digital Copy Model 2201 |
| ८ | दिवाणी न्यायालय(क.स्तर), मालवण | Canon Model iR 2945 |

वर नमूद फोटो कॉपिअर यंत्रांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीविषयक करारामध्ये पुढील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग,मु.ओरोस यांचे नावे असावे. सदर लखोटयावर" फोटो कॉपिअर यंत्रांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीकरीता दरपत्रक " असे नमूद असावे.

२) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार हा १ वर्षाचे कालावधीकरीता असेल.

३) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करणा—या पुरवठादार यांनी फोटो कॉपिअर यंत्राची तक्रार नोंद करणेकरीता आपले संपर्क क्रमांक पुरवावयाचे असून, प्राप्त झालेल्या तक्रारींची त्वरीत दखल घेऊन तक्रारींचे निवारण २ दिवसांचे आत करावयाचे आहे.

४) दरपत्रक सादर करणा—या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

५) करार करणेबाबतचा सर्व खर्च हा यशस्वी दरपत्रकदार यांनी स्वत: करावयाचा आहे.

६) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेकामी, दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकची पहील्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) वर नमूद सर्व न्यायालयांच्या कार्यालयातील वार्षिक देखभाल व दुरुस्तीविषयक कराराबाबतचे देयक दर तिन महिन्यांचे कालावधीनंतर या कार्यालयात सादर करावयाचे आहे. सदर कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयाचे यंत्र दुरुस्तीविषयक तक्रार प्रलंबित असल्यास त्या कालावधीचे देयक अदा केले जाणार नाही व याबाबत कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयकाची रक्कम अदा करताना राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून अदा करणेत येतील.

८) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

९) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचा राहील.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि. १३/०३/२०२५** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

दिनांक :– २८/०२/२०२५

सहाय्यक अधीक्षक(वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

**********

म.जा.क्र.ग्रंथा./९२४० सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक :– २८/०२/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)

२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)

३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)

४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेलद्वारे)

५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)

६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)

७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीसबोर्डवर

८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता